।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक
# माणदेश वार्ता

४२

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३
RNI NO.
MAH/MAR/2004/16467
POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026
FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि ५ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ४१ वा

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या युवा महोत्सवाची सांगोला महाविद्यालयात जय्यत तयारी

### सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे उपस्थित राहणार

सांगोला : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा उन्मेष सृजनरंग युवा महोत्सव येथील सांगोला महाविद्यालयामध्ये होत आहे. ७ ते १० ऑक्टोंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या या युवा महोत्सवाची यजमान महाविद्यालयामध्ये जय्यत तयारी सुरू आहे. महोत्सवाच्या नियोजनासाठी एकूण ३६ समित्यांचे कामकाज अंतिम टप्यात आहे. या महोत्सवामध्ये येणारे मान्यवर आणि कलाकार विद्यार्थ्यांना माणदेशी भोजनाचे नियोजन केले आहे. संभाव्य पावसाची शक्यता विचारात घेऊन यजमान महाविद्यालयाने वॉटरप्रुफ मंडप उभारला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन सुप्रसिद्ध लोककलाकार योगेश चिकटगावकर यांचे शुभ हस्ते होणार आहे. तर पारितोषिक वितरण समारंभ सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांचे शुभहस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू प्रकाश महानवर भूषविणार असल्याची माहिती सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, प्रभारी प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, समन्वयक डॉ. रामचंद्र पवार यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

या युवा महोत्सवामध्ये ललित, वाङ:मय, नाट्य, नृत्य, संगीत आणि लोककला या विभागातील एकूण ३९ कलाप्रकाराची विद्यार्थ्यांची स्पर्धा होणार आहे. या युवा महोत्सवामध्ये ६० महाविद्यालयातील सुमारे दोन हजार विद्यार्थी कलाकार व मान्यवर सहभागी होणार आहेत. युवा महोत्सवासाठी राज्य आणि राज्याबाहेरून येणारे परीक्षक, विद्यापीठ अधिकारी, पदाधिकारी संपादक, पत्रकार आणि, विद्यापीठ संयोजन समिती सदस्य या महोत्सवाच्या नियोजनासाठी चार दिवस मुक्कामी राहणार हे विचारात घेऊन महाविद्यालयामध्ये नियोजन केले आहे. मुलींच्या निवासाची व्यवस्था महाविद्यायातील वसतिगृहामध्ये केली जाणार आहे.




मुलांच्या निवासाची व्यवस्था सांगोला – मंगळवेढा रोडवरील बंधन आणि रामकृष्ण मंगल कार्यालयामध्ये करण्यात आली आहे. इतर मान्यवरांची व्यवस्था सांगोला शहरामध्ये स्वतंत्र करण्यात येणार आहे. या महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांना प्राथमिक आणि अति तातडीची वैद्यकीय मदत मिळणार आहे, त्यासाठी सांगोला ग्रामीण रुग्णालयाची मदत घेतली जाणार आहे. महाविद्याल्यायामधील अग्निशामक यंत्रणा आणि नगरपालिकेचे अग्निशामक पथक महोत्सवामध्ये सज्ज असणार आहे. मुलांच्या निवासापासून वाहतूक व्यवस्थेचे नियोजन केले आहे.

या महोत्सवासाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात येणार आहे. महोत्सवामधील सर्वांना शुद्ध पाणी आणि सात्विक माणदेशी पद्धतीच्या भोजनाचा आस्वाद घेता येणार आहे. संभाव्य पाऊस विचारात घेऊन या महोत्सवातील मुख्य रंगमंच महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर वॉटरप्रुफ मंडप तयार करण्यात आला आहे. या रंग मंचावर उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ, एकांकिका, लोकनृत्य आणि लावणी या महत्वाच्या कलाप्रकाराचे सादरीकरण होणार आहे. महाविद्यालयाचे क्रीडाभवन, बी विंग स्टेज, स्टेप हॉल, सभागृह आदी ठिकाणी लोककला, संगीत, वाङ:मय व ललित कलाप्रकारांचे रंगमंच तयार करण्याचे काम सुरु आहे.

पथनाट्य सादरीकरण महाविद्यालया समोरील प्राध्यापक कॉलनीमध्ये होणार आहे. भोजन, मंडप, वाहतूक, निवास, विविध रंगमंच समित्यांचे कामकाज अंतिम टप्यात आहे महाविद्यालय परिसरामध्ये विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्यामुळे कलाप्रेमी मध्ये सांगोल्यातील महोत्सवा विषयी उत्सुकता वाढली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.केदारनाथ काळवणे, सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ॲड.उदय घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, सदस्य विश्वनाथ चव्हाण, महादेव झिरपे, सोमनाथ ढोले, रावसाहेब ताठे, डॉ.संजीवनी केळकर, शामराव लांडगे, सुरेश फुले, प्रभारी प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांचेसह सर्व संस्था सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली या युवा महोत्सवाचे कामकाज समन्वयक डॉ.रामचंद्र पवार, सहसमन्वयक प्रा.संतोष लोंढे, सहसमन्वयक डॉ.आर.आर. ताठे यांचे समन्वयाने सुरू आहे. या युवा महोत्सवासाठी उपस्थित राहण्याचे अवाहन यजमान महाविद्यालयाचे वतीने करण्यात आले आहे.

युवा महोत्सवामध्ये पूरग्रस्तांसाठी मदत संकलन केंद्र पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा उन्मेष सृजनरंग युवा महोत्सव येथील सांगोला महाविद्यालयामध्ये होत आहे. चार दिवस चालणाऱ्या या युवा महोत्सवामध्ये विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने पूरग्रस्तांसाठी मदत संकलन केंद्र उभारण्यात येणार आहे. या मदत केंद्रामध्ये जमा होणारा निधी राज्यशासनामार्फत पूरग्रस्तांना दिला जाणार आहे.

## सांगोला-वाढेगाव रस्त्याची दुरवस्था, खड्डेमय रस्त्यामुळे प्रवासी व नागरिक त्रस्त दररोज होतोय अपघात



सांगोला : सांगोला तालुक्यातील महत्त्वाचा असा सांगोला–वाढेगाव रस्ता गेल्या काही महिन्यांपासून अतिशय दयनीय अवस्थेत असून या रस्त्याने प्रवास करणे नागरिकांसाठी मोठे संकट ठरत आहे. रस्त्याचे डांबरीकरण उखडून ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यानंतर या खड्ड्यांमध्ये पाणी साचून प्रवाशांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

हा रस्ता सांगोला तालुका व वाढेगाव परिसरातील शेतकरी, व्यावसायिक, विद्यार्थी आणि कामगार वर्गासाठी जीवनवाहिनी मानला जातो. दररोज शेकडो वाहने या मार्गाने धावत असतात. मात्र खराब रस्त्यामुळे वाहनधारकांना वारंवार दुरुस्तीचा खर्च सहन करावा लागत आहे. ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकी तसेच शालेय वाहतूक करणारी जीप व बस या सगळ्यांना खड्ड्यांतून मार्ग काढावा लागतो.

विशेषतः सकाळी शाळा–कॉलेजच्या वेळेत लहान मुले व विद्यार्थी वर्गाला या खड्डेमय रस्त्याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. चिखल व धुळीमुळे आरोग्याच्या तक्रारीही वाढत आहेत. अपघाताचा धोका कायम असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती तसेच स्थानिक प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत. तरीही रस्त्याच्या दुरुस्तीची कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करून दुरुस्ती न झाल्यास मोठे अपघात होण्याची शक्यता आहे, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.स्थानिक ग्रामस्थ व प्रवासी वर्गाने शासन व प्रशासनाला तातडीने लक्ष घालून सांगोला–वाढेगाव रस्ता सुस्थितीत आणण्याची मागणी केली.

दरम्यान सदरील रस्त्याच्या कामाचे टेंडर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने काढण्यात आलेले असून लवकरच सदरील रस्त्याचे काम सुरू होणार असल्याचे समजते.

# स्वस्थ नारी म्हणजे सशक्त परिवाराची पायाभरणी !

स्त्री म्हणून जगतांना खुप काही करावं लागतं
आयुष्य तिचे असते पण दुसऱ्यासाठी जगावं लागतं

समाजाच्या आरोग्याचा व देशाच्या विकासाचा पाया म्हणजे स्त्रीचे आरोग्य. कारण नारी हीच एका परिवाराची, समाजाची आणि अखेर राष्ट्राची मूळ शक्ती आहे. स्त्री निरोगी असेल तरच घर आनंदी असते आणि घर आनंदी असेल तरच समाज सक्षम होतो. हा विचार आपण मान्य केला, तर 'स्वस्थ नारी - सशक्त परिवार' हे फक्त घोषवाक्य न राहता भारताची दिशा दाखविणारा विचार आहे व हाच विचार भविष्यातील प्रत्यक्ष आयुष्याचा मंत्र ठरेल. कारण स्त्री निरोगी असेल तर तिच्या मुलांचे आरोग्य चांगले राहते; घरातील इतर सदस्यांवरही तिचा सकारात्मक परिणाम होतो. परिवारातील प्रत्येक सदस्याचे आरोग्य हे आईच्या आरोग्यावर अवलंबून असते. जर आई निरोगी असेल तर तिचे मूलही निरोगी वाढते. स्त्रीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता तिला नियमित वैद्यकीय तपासणी, मानसिक शांती आणि कुटुंबाकडून आधार मिळाले तर संपूर्ण कुटुंब सक्षम, निरोगी आणि आनंदी राहते. म्हणूनच स्वस्थ नारी हीच सशक्त परिवाराची खरी गुरुकिल्ली आहे. सामाजिक पातळीवर मानसिकता बदलणे, महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

आज स्त्रिया शिक्षण, उद्योग, नोकरी, राजकारण या क्षेत्रांत झेपावत असल्या तरी त्यांच्या आरोग्याकडे अजूनही दुर्लक्ष केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतातील निम्म्याहून अधिक स्त्रिया रक्ताल्पतेने ग्रस्त आहेत. प्रसूतीदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा न मिळाल्याने मातामृत्यू दरही चिंताजनक आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये रक्ताल्पता, कुपोषण, प्रसूतीसंबंधी आजार अजूनही चिंतेचा विषय आहेत. शहरी भागात मात्र मधुमेह, स्थूलता, हृदयविकार यांसारखे जीवनशैलीशी निगडीत आजार वाढत आहेत. घरातील जबाबदाऱ्या, नोकरीतील ताण, समाजाच्या अपेक्षा या सगळ्यामुळे स्त्रीच्या आरोग्याकडे सर्वात शेवटी लक्ष दिले जाते. पण आकडेवारीच्या पलीकडे एक वेगळीच गोष्ट आहे. घरातील स्त्री जर आजारी पडली, तर घरातील वातावरणच बदलून जाते. मुलांच्या चेहऱ्यावरचे हसू हरवते, वृद्धांना आधार उरत नाही आणि पुरुष अस्वस्थ होतो. कारण नारी ही घराचे हृदय आहे. तिच्या हसण्यात कुटुंबाचे सौख्य दडलेले असते, तर तिच्या थकलेल्या नजरेत घराचे दुःख उमटते.

आज सरकार विविध आरोग्य योजना राबवत आहे, जसे प्रसूतीसाठी मोफत वैद्यकीय सेवा, पोषण आहार योजना, महिलांसाठी योग शिबिरे, स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छतागृह सुविधा पण केवळ सरकारी पातळीवर काम करून चालणार नाही. प्रत्येक परिवाराने, समाजाने, कुटुंबाने जागरूक होणे गरजेचे आहे. तसेच, आजच्या आधुनिक समाजात महिला शिक्षण, रोजगार, राजकारण, उद्योग या क्षेत्रात वेगाने प्रगती करत असल्या तरी आरोग्याच्या बाबतीत अजूनही मोठ्या अडचणी दिसून येतात. घरातील प्रत्येकाने हे लक्षात ठेवावे की, मुलींच्या आहाराची काळजी घेणे, किशोरवयीन मुलींना योग्य आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण देणे, स्त्रियांना नियमित आरोग्य तपासणीस प्रवृत्त करणे, घरकामात पुरुषांनी समतोल सहभाग वाढवणे आणि मानसिक आरोग्याबद्दल मोकळेपणाने संवाद साधने. या बाबी महिला आरोग्यासाठी महत्त्वाच्या ठरतात आणि या गोष्टींचा अवलंब झाला तरच 'स्वस्थ नारी-सशक्त परिवार' हा विचार प्रत्यक्षात उतरू शकेल. त्यासाठी कटिबध्द राहणे गरजेचे आहे, तेव्हाच हे शक्य होईल.

आज आपल्याला हे मान्य करावे लागेल की स्त्री ही फक्त घर चालवणारी नाही, तीच घर घडवणारी आहे. तिचे आरोग्य बळकट असेल तर कुटुंब आनंदी राहील आणि आनंदी कुटुंबातूनच सक्षम राष्ट्र उभे राहते. स्त्री निरोगी असेल तरच कुटुंब सशक्त होईल आणि राष्ट्र अधिक प्रगत होईल. म्हणूनच, प्रत्येकाने आपल्यापासून सुरुवात करून स्त्रीच्या आरोग्याचे आणि सन्मानाचे रक्षण करणे हिच आजची खरी सामाजिक जबाबदारी आहे. शेवटी, निरोगी स्त्री, निरोगी पिढी, आनंदी घर म्हणजे सशक्त समाज आणि सशक्त समाज म्हणजे सक्षम राष्ट्र.

स्त्री पुरुष दोघंही समान आहेत आणि सुख मिळविण्यासाठी धडपडणं हा दोघांचाही अधिकार आहे. फक्त पुरुषांना आयुष्यभर सुखात राहावं आणि दु:खाची विभागणी संपली पाहिजे. माणूस या नात्यानं पुरुषाला मिळतं ते जन्मसिध्द स्वातंत्र्य स्त्रीलाही मिळालं पाहिजे. ही स्त्री भूतकाळाशी जोडलेली असते, भावूक आणि हळवी असते. कुटुंबाचा सांभाळ करते, स्वत:ला निराधार वाटत असतांनाही कुटुंबाला आधार देते, पती, मुलगी, मुलगा यांच्यावर प्रेम करते. कधी त्यांचा दुरावा जाणवल्यावर येणारी विफलताही अनुभवते, ती व्यवसायात ही कर्तव्यदक्ष असते. एकंदरीत तिचा सहभाग महत्वाचा हे विसरुन चालणार नाही. चूल आणि मूल मध्ये गुरुफटलेल्या, चालीरितीच्या कुंपणात वावरणाऱ्या स्त्रीला समाजभय संकोच यामध्ये पार दडपून टाकलेलं, पण काळाच्या ओघात परिवर्तनाशिवाय पर्याय नाही. या सबबीनंतर तिने टोकाचे पाऊल उचलून भरारी घेण्याचं ठरवलं. कुटुंबाबरोबरच समाजाच्या उभारणीतही मोलाची भूमीका बजावत आहे, अशा या सशक्त नारीला मानाचा मुजरा !

-प्रविण बागडे,नागपूर

*********************

# शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये स्वस्थ नारी सशक्त परिवार हे अभियान संपन्न



सांगोला : येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये स्वस्थ नारी सशक्त परिवार या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव अंकुश गायकवाड उपस्थित होते तर प्रमुख वक्ते म्हणून संस्थेचे विश्वस्त डॉ.यशोदीप गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी प्राचार्य यांनी सांगितले की, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांच्यामार्फत ''स्वस्थ नारी सशक्त परिवार या अभियानाच्या माध्यमातून महिलांची तपासणी, उच्च रक्तदाब, मधुमेह, गर्भाशयाच्या कर्करोगाची आणि क्षयरोगाची तपासणी केली जाईल. डॉ. गायकवाड म्हणाले की, स्वस्थ नारी सशक्त परिवार हे अभियान महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देते. त्यांच्या गरजांनुसार व्यापक आरोग्य तपासणी आणि सेवा प्रदान करते. यानंतर त्यांनी या अभियानातील महिलांची तपासणी आणि आरोग्य सेवा, निरोगी जीवनशैली आणि पोषण इ.उपक्रमांची माहिती दिली.

डॉ.गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनशैलीमध्ये झालेले बदल, चुकीच्या आहारामुळे उद्भवणारे विविध आजार, जंक फूडचे दुष्परिणाम आणि संतुलित आहाराचे महत्त्व याबद्दल सविस्तर माहिती दिली.

या अभियानांतर्गत कॉलेजमधील सर्व मुलींची कम्प्लीट बलड काउंट चाचणी करण्यात आली. याद्वारे त्यांना रक्तातील हिमोग्लोबिन, लाल रक्तपेशी, पांढऱ्या रक्तपेशी, आणि प्लेटलेट्स बद्दल महत्त्वाची माहिती मिळते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व महिला शिक्षिका यांनी परिश्रम

# कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी महाविस्तार एआय अ‍ॅप लॉंच

सोलापूर : शेतकऱ्यांना हवामान बदल बाजारपेठेतील अस्थिरता, आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून महाविस्तार एआय हे अ‍ॅप लॉंच केले आहे. हे कृषी विभागाने विकसित केलेले एक अत्याधुनिक अ‍ॅप आहे. कृत्रिम बुद्धिमतेच्या सहाय्याने हे अ‍ॅप शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीशी संबंधित सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध करून देते.

मराठी भाषेत उपलब्ध असलेले हे अ‍ॅप शेतकऱ्यांना रिअल टाइम माहिती, तज्ज्ञांचा सल्ला आणि आधुनिक शेती पद्धतींचे मार्गदर्शन करते. महाविस्तार एआय अ‍ॅपमधील एआय चॅटबॉट शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे देते. रिअल-टाइम हवामान अंदाज, स्थानिक पातळीवरील हवामान अंदाजामुळे शेतकरी पेरणी, कापणी आणि खतांचा वापर यांचे नियोजन करू शकतात. स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठेतील पिकांचे भाव रिअल-टाइममध्ये दाखवते. कृषि विभागाच्या विविध कृषी योजनांची माहिती, अनुदान, आणि विमा योजनांचे तपशील एकाच ठिकाणी मिळू शकतील. अ‍ॅपमध्ये मराठीत व्हिडिओ उपलब्ध आहेत. ज्यात पिकांची लागवड, खतांचा वापर, कापणी, आणि जैविक शेती याबाबत तपशीलवार मार्गदर्शन मिळेल. अ‍ॅपमधील एआय तंत्रज्ञान मध्ये शेतकरी पिकांचे फोटो अपलोड करून पिकांवरील रोग आणि किडींचे निदान करुन उपाय मिळवू शकतात. महाविस्तार एआय अ‍ॅप शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य बनवण्यासाठी अनेक फायदे घेऊन आले आहे.

चुकीच्या खतांचा किंवा कीटकनाशकांचा वापर टाळून शेतकरी उत्पादन खर्च कमी करू शकतात. बाजारभाव माहिती आणि हवामान अंदाजामुळे शेतकरी योग्य वेळी पिकांची विक्री आणि नियोजन करू शकतात. यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. गुगल प्ले

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-४४ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# फॅबटेक फाउंडेशनकडून पूरग्रस्तना मदतीचा हात सामाजिक बांधिलकी: २५ लाखांच्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



सांगोला : सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांचे खुप मोठे नुकसान झाले. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सामाजिक बाधिलकी म्हणून सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर-१०, दक्षिण सोलापूर-१७, माढा२१ आणि करमाळा-७ तालुक्यातील एकुण ५५ गावात नुकसानग्रस्त कुटुंबाना सांगोला फॅबटेक फाउंडेशन, फॅबटेक इंजिनिअरिंग कॉलेज, स्पार्कॉन टेक्स्टाईल, फॅबटेक उद्योग समुह आणि फॅबटेक मल्टिस्टेट बॅंक यांच्या संयुक्त विद्यमानाने जीवनावश्यक वस्तूचे कीट वाटप करण्यात आले असल्याची माहिती फॅबटेक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांनी दिली.

फॅबटेक फाउंडेशन मोठ्या प्रमाणात सामाजिक उपक्रम राबवत आहे. पावसामुळे संकटात असलेल्या कुटुंबास गहू, तांदूळ, तुरदाळ, साखर, चहापत्ती, गोडेतेल, गुडनाईड, सतरंज्या, ब्लॅंकेट्स कपडे आदींसह अशा एकुण २० वस्तूंचा समावेश असणारे दहा हजार किट तयार करून पूरग्रस्त भागातील कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूचा मदतीचा हात दिला आहे. फॅबटेक फाउंडेशन सह फॅबटेक परीवार मधील कर्मचाऱ्यांचा एकदिवसीय पगार असा एकुण २५ लाखांच्या वस्तूचे जीवनावश्यक कीट वाटप करण्यात आले आहे.

सामाजिक भान डोळ्यासमोर ठेवून फाउंडेशन फाउंडेशन सामाजिक उपक्रम राबवत असुन यापुर्वी वृद्धाश्रमात अन्नदान, वारकऱ्यांना रेनकोट वाटप, फराळ आदींसह अनेक उपक्रम फॅबटेक फाउंडेशनच्या माध्यमातून होत आहेत.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी फॅबटेक एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. अमित रूपनर, फॅबटेक फाउंडेशनचे उपाध्यक्ष डॉ. सुरज रूपनर, फॅबटेक मल्टिस्टेट बॅंकेचे संचालक डॉ. संजय आदाटे, सीईओ बाबासाहेब भोसले, कर्ज विभागप्रमुख दिपक नागणे, मुख्य वित्त अधिकारी विजय तंडे आदींसह फॅबटेक फाउंडेशन सह फॅबटेक परिवारातील सदस्यांनी परीश्रम घेतले.

## राज्यात भूकरमापक संवर्गातील ९०३ पदांची भरती
## १ ते २४ ऑक्टोबरदरम्यान ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर : भूमी अभिलेख विभागातील गट क भूकरमापक संवर्गातील ९०३ रिक्त पदे भरण्यासाठी परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असून १ ते २४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात भूकरमापक संवर्गातील एकूण १ हजार १६० पदे रिक्त असून त्यापैकी ९०३ पदे सरळसेवेने भरण्यात येणार आहेत. यामध्ये पुणे विभागातील ८३ पदे, कोकण (मुंबई) विभाग – २५९, नाशिक – १२४, छ. संभाजीनगर – २१०, अमरावती – ११७ आणि नागपूर विभागातील ११० पदांचा समावेश आहे. उमेदवारांचे अर्ज https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ आणि https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळांवर ऑनलाईनरित्या स्वीकारण्यात येणार आहेत. सदर भरतीसाठी १३ व १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ऑनलाइन परीक्षा घेण्यात येणार आहे. परीक्षेसाठीची पात्रता : मान्यताप्राप्त महाविद्यालयातील किंवा संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरींग) धारक, किंवा माध्यमिक शालांत परीक्षेनंतर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्वेक्षक व्यवसायाचे प्रमाणपत्र (आयटीआय सर्व्हेअर) धारक उमेदवारांना अर्ज करता येईल. आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे विभागनिहाय सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर सामाजिक व समांतर आरक्षणानुसार कागदपत्र पडताळणी करून विभागनिहाय अंतिम निवड यादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात येईल, असे राज्याचे जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख डॉ. सुहास दिवसे यांनी कळविले आहे.

## आलदर हॉस्पिटलच्या वतीने गोडसेवाडी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न; ९० रुग्णांनी घेतला लाभ

सांगोला : डॉ.महावीर आलदर यांच्या आलदर हॉस्पिटलच्या वतीने नवरात्री निमित्त गोडसेवाडी (कमलापूर) येथे बालकांचे मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषध उपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा ९० रुग्णांनी लाभ घेतला. यावेळी डॉ.महावीर आलदर यांनी महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेच्या संदर्भात रुग्णांना व त्यांच्या पालकांना आरोग्यांविषयी माहिती दिली. तसेच यावेळी त्यांनी लहान बालकांना होणारे आजार व घेण्याची काळजी व आलदर हॉस्पिटल मधे नवजातशिशु अतिदक्षता विभाग, लहान बाळासाठी अतिदक्षता विभाग व सर्जरी विभागातील रुग्णांसाठी आलदर हॉस्पिटल हे २४ तास आपल्या सेवेत तयार आहे. गरीब व गरजू रुग्णांनी योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन करत सध्या योजनेअंतर्गत गरीब व गरजू रुग्णांचा भरपूर फायदा होत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी साधू गोडसे, ग्रामसेवक संजय खटकाळे, विपुल गोडसे, विलास गोडसे, अमोल गोडसे, रोहन गोडसे, आबासो गोडसे, सचिन गोडसे, मनोज पवार, तसेच शिक्षक लक्ष्मी कारंडे मॅडम, रामचंद्र तंडे सर, दिगंबर पाटील सर, ग्रामस्थ,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व ग्रामस्थांनी डॉ.महावीर आलदर, स्टाफ नितीन भोसले, सुनिल बुरुंगे यांचे आभार मानले.

# फॅबटेक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचा पालक मेळावा उत्साहात



सांगोला : फॅबटेक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक महाविद्यालयात शुक्रवार दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. हा पालक मेळावा मोठ्यात उत्साहात संपन्न झाला असल्याची माहिती प्राचार्य तानाजी बुरूंगले यांनी दिली.

या पालक मेळाव्याचे उद्घाटन पॉलिटेक्निक कॉलेज मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. दत्तात्रय नरळे, पालक प्रतिनिधी दिपक गवळी व सविता लेंडवे, प्रा. भावना माईनकर, प्रा. श्रीकांत बुरुंगले, प्रा. अरूण लोखंडे, प्रा. बिरा वगरे, प्रा. अजयकुमार भोसले आदींच्या हस्ते सरस्वती पूजन करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात येणार आली. पालक मेळाव्यास उपस्थित पालक प्रतिनिधी यांचे महाविद्यालयाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भावना माईनकर यांनी केले. द्वितीय व तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रथम चाचणी परीक्षेत उज्वल यश प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन अभिनंदन करण्यात आले. या मेळाव्यात पालक प्रतिनिधी दिपक गवळी व सविता लेंडवे यांनी मनोगत व्यक्त केले.

या पालक मेळाव्यात प्रा. श्रीकांत बुरूंगले, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. दत्तात्रय नरळे यांनी उपस्थित पालकांना संबोधित करून विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.स्वप्निल बंडगर यांनी केले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी फॅबटेक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक मधील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सांगोला रोटरी क्लबच्या स्वच्छता अभियानाने परिसर सजला; महात्मा गांधी जयंती निमित्त रोटरी क्लबचा उपक्रम

सांगोला : दिनांक २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त सांगोला रोटरी क्लबच्या वतीने विशेष स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले. हे अभियान महात्मा फुले चौक, एसटी स्टॅंड आवार, वासुद चौक आणि रेल्वे ब्रिज बोगदा या प्रमुख ठिकाणी घेण्यात आले.

अभियानाची सुरुवात संत गाडगेबाबा व महात्मा गांधी यांच्या फोटो प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून



करण्यात आली. यामुळे उपस्थित सदस्य व नागरिकांमध्ये उत्साह निर्माण झाला आणि अभियानाची गरज तयार झाली.

अभियानात रोटरी क्लबचे रोटेरियन सदस्य सक्रिय सहभागी होते. यामध्ये डॉक्टर प्रभाकर माळी, डॉक्टर अनिल कांबळे, इंजिनीयर मधुकर कांबळे, सी ए के एस माळी, इंजिनिअर हमीद शेख, डॉक्टर संतोष पिसे, विजय म्हेत्रे, इंजिनिअर विलास बिले, इंजिनिअर विकास देशपांडे, इंजिनियर अशोक गोडसे, सुरेश माळी, गोविंद माळी, सौ मंगल चौगुले, सौ प्रतिमा माळी, अरविंद डोंबे गुरुजी उपस्थित होते.

स्वच्छता मोहिमेद्वारे परिसरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेची व पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला. उपस्थित सदस्यांनी रस्ते, चौक, आवार व पुलांची स्वच्छता करून हातभार लावला.

रोटरी क्लबचे उपक्रम नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश पोहोचविण्यासाठी व परिसर सुशोभित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहेत. या मोहिमेमुळे सांगोल्यात स्वच्छतेची नवचैतन्य निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.

# शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करावेत
## वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तहसीलदार यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी



सांगोला : सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत/ नुकसान भरपाई तात्काळ मिळावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निवेदनाद्वारे तहसीलदार संतोष कणसे यांच्याकडे करण्यात आली असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष विनोद भैय्या उबाळे यांनी दिली.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुका उपाध्यक्ष सुनील कांबळे, कपिल बनसोडे उपस्थित होते.

संपूर्ण महाराष्ट्रभर गेली काही दिवसापासुन पावसाने धुमाकूळ घातला आहे. या सलग आणि मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याचा फटका सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यालाही मोठ्या प्रमाणात बसला आहे. गावोगावी शेतकऱ्याच्या शेतामध्ये पाणी साचले असून डाळिंब, पेरू, शिमला मिरची बाजरी यासारख्या पिकांचा मोठ्या प्रमाणात बळी गेला आहे. शेतकरी आर्थिक संकटात आला आहे. त्यामुळे सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करावेत.

शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचून त्यांचे तत्काळ पंचनामे करून घ्यावेत, जेणेकरून शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित राहणार नाही. तरी कृपया करून तालुक्यातील सर्व मंडल मधील सरसकट पंचनामे करून त्यांना तत्काळ मदत करण्यात यावी, अन्यथा वंचित बहुजन आघाडी शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल,याची नोंद घ्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने एकाही शेतकऱ्याचा पंचनामा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. तालुक्यात ज्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे अद्याप पंचनामे झाले नाहीत किंवा काही अडचणी असल्यास शेतकऱ्यांनी संपर्क आमच्याशी संपर्क साधावा. असे तालुकाध्यक्ष विनोद उबाळे यांनी सांगितले.

# गुरुमाऊली पतसंस्थेच्या वतीने दीपावली भेट व लाभांश वाटपास शुभारंभ



सांगोला : गुरुमाऊली नागरी सहकारी पतसंस्था मर्या.सांगोला यांचेकडून दीपावली भेट व लाभांश वाटपाचा शुभारंभ शुक्रवार दि.३ ऑक्टोबर रोजी संस्थेचे चेअरमन मारुतीआबा बनकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

पतसंस्थेस दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ अखेर २ कोटी १५ लाख १४ हजार ५१३ एवढा नफा झाला असून सभासदांना १२% लाभांश व दिपावली भेट, १० किलो साखर, ३ जेमिनी तेल पिशवी, २ किलो ह.दाळ, १ संतुर साबण व १ उटणे आदी वाटप केले जाणार आहे.

यावेळी शिवाजीनाना बनकर, विजय कुंडलिक राऊत, ॲड.तुकाराम ढेरे, मा.उपनगराध्यक्ष सुरेश माळी, रामचंद्र बनकर, श्री.तंडे वकील, पांडुरंग जानकर, व्हा.चेअरमन श्री.शिवशंकर शेटे, सुर्यकांत दौंडे, महादेव ननवरे, दीपक खडतरे, श्रीकांत बनकर, सिद्धेश्वर लिंगे, भीमराव फुले सर, रावसाहेब शेंबडे, तज्ञ संचालक गोविंद आहेरकर, सभासद श्री.सुखदेव पवार, नंदकुमार ठोंबरे, नितीन फुले, अभिजीत दौंडे उपस्थित होते.

साखर वाटप ३ ऑक्टोंबर ते २० ऑक्टोंबर या कालावधीत सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत करण्यात येणार असून येताना १ पिशवी घेऊन यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# फॅबटेक इंजिनिअरिंग कॉलेज आणि सॉफ्टटेक सोल्युशन अँड ट्रेनिंग प्रा. लि. पुणे यांच्यात सामंजस्य करार

सांगोला : फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालय आणि पुणे येथील सॉफ्टटेक सोल्युशन अँड ट्रेनिंग प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार झाला असल्याची माहिती संस्थेचे सचिव डॉ. अमित रूपनर यांनी दिली. फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसना इंडस्ट्रियल व्हिजिट, वर्कशॉप, गेस्ट लेक्चर्स, इन प्लांन्ट ट्रेनिंग, स्पॉन्सर्ड प्रोजेक्ट आदीसह महाविद्यालयातील अनेक गोष्टीसाठी सॉफ्टटेक सोल्युशन अँड ट्रेनिंग प्रा. लि. कंपनीचा फायदा होणार आहे. हा करार होणेसाठी प्रा.गणेश मिसाळ यांनी समन्वयक घडवून आणाला. करार दरम्यान आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. सोमनाथ ठिगळे, डॉ. सहदेव शिंदे, प्रा. गणेश हुंडेकरी आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. हा करार झाल्यानंतर फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती नीलवर्णा बिरासाहेब रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ. अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा. प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ. रविंद्र शेडंगे, उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास घडवून घ्यावा- न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील
## डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालय येथे कायदेविषयक शिबीर संपन्न




सांगोला : महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, सोलापूर यांचे आदेशान्वये सांगोला तालुका विधि सेवा समिती व विधिज्ञ सेवा संघ, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला आवारामध्ये नुकतेच कायदेविषयक शिबीराचे आयोजन करणेत आले होते. आजच्या काळामध्ये प्रत्येक विद्यार्थी यांना कायद्याचे ज्ञान व्हावे या उद्देशाने हे शिबिर आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सांगोला न्यायालयाचे सह दिवाणी न्यायधीश श्रीमती. ए.ए.पाटील मॅडम यांनी भूषविले. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून डॉ.प्राचार्य डॉ.सिकंदर मुलाणी , सांगोला विधीज्ञ संघाचे उपाध्यक्ष श्री.एस.बी.दिवसे, सांगोला विधीज्ञ संघाच्या महीला प्रतिनीधी ॲड श्रीमती एस.व्ही.बोत्रे उपस्थीत होते.

प्रास्तावीक सांगोला विधीज्ञ संघाच्या सदस्या ॲड श्रीमती सी.व्ही.बनकर यांनी केले. सुत्रसंचालन सांगोला विधीज्ञ संघाच्या सदस्या ॲड श्रीमती एच.डी.मेनकुदळे-घोंगडे यांनी केले. Posco Act २०१३ या विषयावर बोलताना ॲड श्रीमती एस.एस.दळवी-केदार यांनी या कायद्याची निर्मीती, गरज व समाजामध्ये या कायदयाचे महत्व विषद करताना उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील वेगवेगळया प्रकरणांतील न्यायनिर्णय यांचे दाखले देवून समजावून सांगितले. International Literacy Day या विषयाचे महत्व सांगताना सांगोला विधीज्ञ संघाचे सदस्य ॲड.जी.एल. भाकरे यांनी आपल्या ओघवत्या भाषेतून साक्षरता दिनाचे महत्व समजावून सांगितले. त्यासाठी त्यांनी संतपरंपरेतील अनेक दृष्टांत देवून या विषयाची व्यापकता विदयार्थ्यांना समजावून सांगितली. साक्षरतेसाठी व प्रत्येकाला ज्ञान मिळावे या उदात्त हेतूकरीता महात्मा ज्योतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी आपले संपूर्ण जीवन समर्पीत केल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच २१ व्या शतकात प्रत्येकाने ई - साक्षर होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

Child Friendly Legal Services For Children या विषयावर बोलताना सांगोला विधीज्ञ संघाच्या सदस्या ॲड श्रीमती पी.डी.राजमाने यांनी सांगितले की, समाजातील गुन्हेगारी रोखण्याकरीता, बाल गुन्हेगारीचे प्रमाण कमी करणेकरीता या विषयाची निर्मीती, गरज, कार्य, व महत्व अतिशय उत्तमप्रकारे समजावून सांगितले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात दिवाणी न्यायालयाच्या सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती पी.ए.पाटील मॅडम यांनी शिबीरातील प्रत्येक विषयावर अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. तसेच या स्पर्धेच्या युगात प्रत्येक विदयार्थ्याने शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा सर्वांगीण विकास घडवून घेतला पाहीजे असे आवाहन केले. तसेच उपस्थीत विदयार्थ्यांशी संवाद साधला.

या कार्यक्रमास विधीज्ञ संघाचे सदस्य ॲड.जी.एम.खटकाळे, ॲड श्रीमती एन.एम. जवंजाळ, तसेच प्रा.माने सर, श्री.शिंदे सर तसेच बहूसंख्य कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी व विदयार्थी मोठया संख्येने उपस्थीत होते.

शेवटी आभार सांगोला विधीज्ञ संघाच्या सदस्या ॲड श्रीमती ए.डी.कांबळे यांनी मानले. हा कार्यक्रम आयोजीत करणेकामी सांगोला विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड.एम.एन.ढाळे, डॉ गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिकंदर मुलाणी, प्रा.श्रीमती सिमा गायकवाड, सांगोला न्यायालयातील कर्मचारी श्री.वाय. जी.तारे, श्री.पी.एन. आदमाने, श्री. डी.बी.पाटील यांनी परिश्रम घेतले.

निर्भिड व सडेतोड बातम्या नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता